# नियमीत दिवाणी दावा क्र.९/२०१७
# CNRNoMHOS120002302017
# गोरख लोहार व इतर वि. शासन व इतर
# नि.क्र. ७५ खालील आदेश

(आदेश दि.०३/०१/२०२४)

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम भैरट व मयत प्रतिवादी क्र.१० श्रीपती भैरट यांचे वारस रेकॉर्डला घेण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ यांचा मृत्यु सन १९९९ मध्ये तर प्रतिवादी क्र. १० यांचा मृत्यू सन १९९६ मध्ये झालेला आहे. त्याचे वारस वेळेमध्ये अभिलेखावर न घेतल्यामुळे त्यांच्या विरुध्द दावा अबेट झालेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे एक ते दीड वर्षापासून कोरोना संसर्ग असल्यामुळे तसेच वादी व प्रतिवादी क्र.३ व १० यांचा मृत्यू दाखला उपलब्ध न झाल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वेळेमध्ये देता आला नाही. वादींना दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.३ व १० हे मयत असल्याचे माहिती मिळाली नव्हती. तथापि, प्रतिवादी क्र.३ व १० यांना दाव्याचे समन्स लागत नसल्यामुळे वादीने त्याबाबत चौकशी केली असता वादीला दिनांक २९.०१.२०२० रोजी प्रतिवादी क्र.३ व १० हे १९९९ व १९९६ साली मयत झाल्याचे कल्पना प्रथम मिळाली. वादीला प्रतिवादी क्र.३ व १० यांचा मृत्यू दाखला मिळालेला नाही. प्रकरण स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जाची नोटीस प्रस्तावित प्रतिवादी यांच्या वारसांना काढण्यात आली. काही वारसांना नोटीस लागली असुन काहींना बजावणी झाली नसल्याचे दिसून येते. तथापि, प्रकरण पाच वर्ष जुने असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यासाठी घेण्यात आला. प्रतिवादीच्या प्रस्तावित वारसांपैकी काही वारसांनी अर्जात नमुद कारण योग्य व संयुक्तिक नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. याकामी वादीने प्रतिवादी क्र.३ व १० यांचा मृत्यु दाखला प्रमाणीत प्रत

दाखल केली नाही. तथापि, प्रस्तुत अर्जामध्ये वादीला त्यांचा मृत्यू दाखल प्राप्त झाला नसल्याचे कथन करुन त्या पृष्ठयार्थ शपथपत्र सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे, मयत प्रतिवादींच्या काही हजर वारसांना त्यांच्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ व १० हे मयत असल्याची बाब नाकारलेली नाही. त्याचप्रमाणे, या प्रकरणातील प्रतिवादी क्र. ३ व १० यांच्या समन्सबाबत प्राप्त झालेल्या बेलिफ अहवालावरुन त्यांचा मृत्यू दहा ते पंधरा वर्ष आधी झाल्याचे दिसून येते. अर्जातील कथनाप्रमाणे देखील प्रतिवादी क्र. ३ व १० यांचा मृत्यू १९९९ व १९९६ साली म्हणजेच प्रस्तुतचा दावा दाखल होण्याआधी वीस ते पंचवीस वर्षे पुर्वी झाल्याचे स्पष्ट होते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका २२ च्या तरतुदी या केवळ दावा दाखल झाल्यानंतर त्या दाव्यातील वादी अथवा प्रतिवादी मयत झालेल्या परिस्थीतीत लागु होतात. तथापि, प्रस्तुत अर्जातील कथनानुसार व प्राप्त बेलिफ अहवालानुसार प्रतिवादी क्र.३ व १० यांचा मृत्यू प्रस्तुतचा दावा दाखल होण्याआधी वीस ते पंचवीस वर्षापुर्वी झाल्याचे स्पष्ट होते. याचाच अर्थ वादीने प्रस्तुतचा दावा हा दाखल करते वेळेस मयत प्रतिवादी क्र.३ व १० यांच्या विरोधात दाखल केला होता हे स्पष्ट होते. तथापि, प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादींना प्रतिवादी क्र.३ व १० यांच्या मृत्यूची कल्पना दावा दाखल करतेवेळी नव्हती व बेलिफ अहवालाच्या अनुषंगाने प्रथमच वादींना त्या गोष्टीची कल्पना झाल्याचे कथन केलेले आहे. प्रक्रिया संहितेच्या तरतुदीचा महत्वाचा उद्येश हा न्यायदानास मदत करणे असा असतो. केवळ प्रक्रिया संहितेच्या तरतुदीमुळे पक्षकाराच्या मुलभुत हक्कांवर गदा निर्माण होणे हे अपेक्षीत नसते. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी असल्यामुळे प्रस्तावित मयत प्रतिवादींच्या वारसांशिवाय प्रस्तुत दाव्याचा न्यायनिर्णय प्रभाविपणे दिला जावु शकत नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका २२ अन्वये निर्माण होणारा तांत्रीक मुद्या हा प्रस्तुत प्रकरणाच्या प्रभावी न्यायनिर्णय देण्याच्या मार्गात वरचढ ठरु शकत नाही. या कारणाने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. नि. क्र.७५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांच्या

आत करण्याची आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च वादी यांनी सोसण्याचा आहे.

स्वा/-०३.०१.२०२४

दिनांक – ०३/०१/२०२४

(ए. पी. कुलकर्णी),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Sayyad R. M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 03/01/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 03/01/2024 |
| Order uploaded on | --- | 03/01/2024 |